# जिल्हा उद्योग मित्र समिती सभा, दिनांक ११/६/२००९ चे इतिवृत्त.

सर्व प्रथम महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव, जिल्हा उद्योग मित्र समिती सभा यांनी मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा उद्योग मित्र समिती सभा व इतर उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर सभेच्या प्रत्यक्ष कामकाजास प्रारंभ झाला. दिनांक २५/९/२००८ रोजी झालेल्या जिल्हा उद्योग मित्र समिती सभेचे इतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यात आले. मागील सभेच्या इतिवृत्तामध्ये एकूण १३ विषय होते. त्यापैकी विषय क्रमांक १, ४, ११, व १३ हे निकाली निघाल्यामुळे सदर इतिवृत्तामध्ये सदर विषय वगळले आहेत. त्यानंतर खालीलप्रमाणे सभेत चर्चा व निर्णय झाले.

| अ.क. | औद्योगिक संघटना | विषय | चर्चेचा सारांश/सभेचा निर्णय | संबंधित विभाग |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | बीड जिल्हा उद्योजक विकास संघटना | एमआयडीसी मध्ये अद्यापपर्यंत पक्या गटारी नसल्यामुळे पावसाळयात अस्वच्छता होते. त्यामुळे या भागातील नागरीकांचे आरोग्य धोक्यात येते. तरी पक्या नाल्या होण्याबाबत चर्चा व निर्णय. | उप अभियंता, म.औ.वि.म., बीड यांनी निवेदन केले की, औद्योगिक क्षेत्रामध्ये गटारी असून त्या खुल्या आहेत. गटारामध्ये पाणी साचत नाही. पाणी वाहून जाण्यासाठी सुरळीत मार्ग आहे. यावर औद्योगिक संघटनांच्या पदाधिका-यांनी निवेदन केले की, पाणी साचून राहणार नाही याबाबत दक्षता घेणे आवश्यक आहे. यावर मा.अध्यक्षांनी आवश्यक उपाययोजना करण्याचे आदेश दिले. | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ |
| २ | बीड जिल्हा उद्योजक विकास संघटना | सध्या एमआयडीसीतील प्लॉटस शिल्लक नाहीत. आरक्षित जागेत प्लॉटींग करण्याबाबत तसेच खालीवर जागा (डोंगराळ भाग) आरक्षीत करणे बाबत चर्चा व निर्णय. | या वर उप अभियंता, म.औ.वि.म. बीड यांनी निवेदन केले की, बीड औद्योगिक क्षेत्रामध्ये मोकळण्या जागेचे प्रमाण कमी असल्यामुळे डोंगराळ जमीनीचा भाग राखीव ठेवलेला आहे. काही भूखंडावर उत्पादन सुरु झालेले नाही. यावर मा.अध्यक्षांनी आदेश दिले की, उद्योजकांनी उपयोगात न आणलेले भूखंड ताब्यात घेण्याची कार्यवाही संबंधितानी सुरु करावी. यासाठी प्लॉट धारकांना नोटीसा पाठवाव्यात. उद्योजकांना उद्योग सुरु करण्यासाठी औद्योगिक क्षेत्रात प्लॉट मिळत नसल्यामुळे औद्योगिक क्षेत्राच्या विस्तारीकरणाचा मुद्या औद्योगिक संघटनांच्या पदाधिका-यांनी मांडला. या संदर्भात मा.अध्यक्षांनी आदेश दिले की, वर्तमान पत्रामध्ये या संदर्भात जाहीर प्रगटीकरण प्रसिध्द करुन प्लॉट मिळण्याबाबत उद्योजकांकडून अर्ज मागवून घ्यावेत व मागणी तपासून पहावी. | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ |
| ३ | बीड जिल्हा उद्योजक विकास संघटना | एमआयडीसी मध्ये सार्वजनिक स्वच्छतागृह करण्यात यावे. | या वर उप अभियंता, म.औ.वि.म. बीड यांनी निवेदन केले की, स्वच्छता अभियानातंर्गत स्वच्छतागृहाचे बांधकाम करावयाचे आहे. | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | बीड जिल्हा उद्योजक विकास संघटना | एमआयडीसी मधील रस्त्यावर जागोजागी असलेले गतिरोधक न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे अद्याप का हटविले नाही, ते त्वरित काढण्यात यावे. | या वर मा.अध्यक्षांनी मुख्याधिकारी, नगर पालिका, बीड यांना असे आदेश दिले की, गतिरोधकाचे सर्वेक्षण करुन अहवाल सादर करावा. आवश्यक असलेले गतिरोधक ठेवावेत व अनावश्यक गतिरोधक काढून टाकावेत. | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व नगर पालिका, बीड |
| ५ | बीड जिल्हा उद्योजक विकास संघटना | एमआयडीसी अंतर्गत रोडची सुधारणा करण्याबाबत चर्चा व निर्णय. | उप अभियंता, म.औ.वि.म. बीड यांनी निवेदन केले की, औद्योगिक क्षेत्र, बीडमधील रस्त्यांची दुरुस्ती करण्याचे काम दोन महिन्यात पूर्ण होईल. | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ |
| ६ | बीड जिल्हा उद्योजक विकास संघटना | एमआयडीसीच्या पाईप लाईनवर खाजगी कनेक्शन दिल्यामुळे उद्योजकांना पाणी कमी दाबाने मिळते. न.प.कडून घेतलेल्या पाईप लाईन वरुन खाजगी कनेक्शन बंद करणे व त्यांच्यासाठी न.प.ने नवीन पाईप लाईन टाकणे बाबत चर्चा व निर्णय. | या संदर्भात मा. अध्यक्षांनी उप अभियंता, म.औ.वि.म. बीड यांना निर्देश दिले की, किती दाबाने पाणी पाहिजे, ही बाब मुख्याधिकारी, नगर पालिका, बीड यांना लेखी कळवून पाण्याची मागणी करावी. म.औ.वि.म. नगर पालिका, बीडकडून पाणी विकत घेते, ही बाब मुख्याधिकारी, नगर पालिका, बीड यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. तसेच नगर पालिकेने पाणी पुरवठयाचे दर वाढविल्यामुळे फरकाची रक्कम म.औ.वि.म.कडून देय आहे. यावर मा. अध्यक्षांनी आदेश दिले की, म.औ.वि.म. बीड यांनी थकबाकीच्या रक्कमेचा भरणा नगर पालिका, बीड यांना त्वरित करावा. | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व नगर पालिका, बीड |
| ७ | बीड जिल्हा उद्योजक विकास संघटना | एमआयडीसी मध्ये महत्वाच्या ठिकाणी मार्गदर्शक फलक लावावेत | उप अभियंता, म.औ.वि.म. बीड यांनी निवेदन केले की, तीन ठिकाणी मार्गदर्शक फलक आहेत. यावर मा. अध्यक्षांनी आदेश दिले की, सर्व चौरस्त्यांच्या ठिकाणी मार्गदर्शक फलक लावावेत. | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ |
| ८ | बीड जिल्हा उद्योजक विकास संघटना | एमआयडीसीच्या हद्दीत दारुच्या दुकाना, मटका, आदी अवैध व्यवसाय बेकायदेशीरपणे चालू आहेत. तसेच एमआयडीसीने बेकायदेशीररित्या वाटप केलेल्या जागे बाबत अनेक वेळा लेखी निवेदने देऊनही निर्णय होत नाही याबाबत चर्चा व निर्णय | मा.अध्यक्षांच्या स्वाक्षरीचे अर्ध शासकीय पत्र क्र. २७७८, दिनांक ०४/६/२००९ अन्वये औद्योगिक क्षेत्र, बीडमध्ये अवैध व्यवसाय करणा-यावर कार्यवाही करण्याबाबत पोलीस अधिक्षक, बीड यांना कळविले आहे. सदर मुद्या निकाली निघाला. | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | ---,,---- | बीड जिल्हयात गेवराई येथे कॉटन पार्कची स्थापना करण्यासाठी मंजुरी मिळण्याबाबत. | या संदर्भात महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, बीड यांनी निवेदन केले की, कॉटन पार्कची स्थापना करण्याबाबतच्या योजनेतंर्गत औद्योगिक संघटनांचा सहभाग महत्वाचा आहे. तसेच एकूण प्रकल्प खर्चामध्ये २५ % औद्योगिक संघटना, २५ % राज्य शासन व ५० % केंद्र शासन (परतावा स्वरुपात ) असा निधीचा आकृतीबंध असून औद्योगिक संघटनांनी विहीत निकषानुसार प्रस्ताव तयार करुणे आवश्यक आहे. याबाबतीत मा.अध्यक्षांनी सर्व संबंधितांची बैठक आयोजित करण्याबाबत सुचित केले. | जिल्हयातील औद्योगिक संघटना व जिल्हा उद्योग केंद्र, बीड |
| १० | नंदकिशोर ओमप्रकाश जाजू, बीड | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबादच्या अधिका-यानी बीड येथे भेट देण्याबाबत. | या बाबत मा. अध्यक्षांनी आदेश दिले की, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबादच्या अधिका-यांनी बीड येथे महिन्यातून किमान दोन वेळा भेटी द्याव्यात. | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद |
| ११ | --,,--- | म.औ.वि.म. च्या क्षेत्रातील भूखंड हस्तांतरण करण्यासाठी सरकारी कामगार अधिकारी, बीड यांच्याकडून ना हरकत प्रमाणपत्र मिळत नसल्याबाबत. | औद्योगिक संघटनांच्या पदाधिका-यांनी असे निदर्शनास आणून दिले की, म.औ.वि.म. च्या क्षेत्रातील भूखंड हस्तांतरण करण्यासाठी महामंडळाचे अधिकारी सरकारी कामगार अधिकारी, बीड यांचे ना हरकत प्रमाणपत्राची मागणी करतात. यावर औद्योगिक संघटनांच्या पदाधिका-यांनी निवेदन केले की, लघू उद्योग घटकांना फॅक्टरी ॲक्ट लागू नसल्यामुळे संबंधितानी सदर प्रमाणपत्राची मागणी करु नये. या बाबीस सरकारी कामगार अधिका-यानी सहमती दर्शविली. मा.अध्यक्षांनी आदेश दिले की, फॅक्टरी ॲक्ट लागू नसलेल्या उद्योगाच्या भूखंडाचे हस्तांतरण करण्यासाठी म.औ.वि.म. अधिका-यांनी वरील प्रमाणपत्राचा आग्रह धरु नये. | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ. |
| १२ | ---,,--- | धारुर औद्योगिक क्षेत्रामध्ये वीज पुरवठा करण्याबाबत. | सर्व निकषांची पुर्तता झाल्यानंतर वीज पुरवठा करण्याबाबत मा.अध्यक्षांनी संबंधिताना आदेश दिले. | अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, बीड |
| १३ | ---,,--- | धारुर औद्योगिक क्षेत्रामध्ये पाणी, रस्ते या सारख्या मुलभूत सुविधा पुरविण्याबाबत | सर्व निकषांची पुर्तता झाल्यानंतर मुलभूत सुविधा पुरवाव्यात असे आदेश मा. अध्यक्षानी संबंधिताना दिले. | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ. |

सभेचे वरील प्रमाणे कामकाज संपन्न झाल्यानंतर सदस्य सचिवानी सर्व उपस्थितांचे आभार मानले व सभा संपल्याचे मा.अध्यक्षांच्या परवानगीने घोषित केले.

महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव,
जिल्हा उद्योग मित्र समिती सभा, बीड

मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा उद्योग मित्र समिी सभा, बीड.